RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक ४०] शुक्रवार, ऑगस्ट ७, २०२६/श्रावण १६, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑगस्ट, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, कामगार १९६९.**

क्रमांक युडब्ल्युए-२०२५/प्र.क्र.२०९/काम-५.— महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ (१९६९ चा महा. ३०) (यापुढे "सदर अधिनियम" म्हणून ओळखले जाईल) च्या कलम २६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अधिनियमासोबतच्या अनुसूचीत उक्त कलम २६ अन्वये आवश्यकता असल्यानुसार अशी सुधारणा करण्यासंबंधात उद्देश असल्याबाबत ३ महिन्यांची सूचना दिल्यानंतर खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

अधिनियमाला संलग्न असलेल्या अनुसुचीमधील,—

(१) नोंद क्र. १ मधील "लोखंड व पोलाद किंवा दुकान यातील नोकरी" या शब्दांनंतर कंसामध्ये "(इमारत व इतर बांधकाम कामे वगळून)" या शब्दांचा समावेश करण्यात येईल.

(२) नोंद क्र. ५ मधील "इतर आस्थापनामधील नोकरी" या शब्दांनंतर कंसामध्ये "(इमारत व इतर बांधकाम कामे आणि घरगुती किंवा कार्यालयीन सामानाच्या स्थलांतराची कामे वगळून)" या शब्दांचा समावेश करण्यात येईल.

(३) नोंद क्र. १५ मध्ये सुधारणा करुन त्याऐवजी खालील नोंदीचा समावेश करण्यात येईल :—

"१५. माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामाच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगीक कामे करुन, अशा प्रकारच्या इतर कामासंबधातील धातु (लोखंड व पोलाद वगळून) व कागद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी (इमारत व इतर बांधकाम कामे वगळून)".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वप्निल कापडणीस,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th August, 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Mathadi, hamal and other manual Workers (Regulation of Employment & Welfare) Act, 1969.

No.UWA-2025/C.R.209/LAB-5.— In exercise of the powers conferred by section 26 of the Maharashtra Mathadi, Hamal and other Manual Workers (Regulation of Employment and Welfare) Act, 1969 (Mah. XXX of 1969) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby amends Schedule appended to the said act, after giving 3 months notice of its intention, so to do, as required by the said section 26, as follows namely :—

In the Schedule appended to the said Act,—

(1) in item No. 1 after the words "to such operations" the brackets and words "(excluding building and other construction work)" shall be added;

(2) in item No. 5 after the words "entries in this Schedule" the brackets and words "(excluding building and other construction work and work related to shifting of house or office)" shall be added; and

(3) for item No. 15, the following entry shall be substituted, namely:-

"15. Employment in Metal (excluding iron and steel) and paper market or shops in connection with loading, unloading, stacking, carrying, weighing, measuring or such other work including work preparatory or incidental to such operations (excluding building and other construction work)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SWAPNIL KAPADNIS,
Deputy Secretary (Labour) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.